<u>जलस्वराज-२ प्रकल्प</u>

<u>जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,चौथा मजला,रायगड जिल्हा परिषद,अलिबाग,</u>

<u>दुरध्वनी क्रमांक ०२१४१-२८२४४०</u>

<u>कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठीची जाहिरात</u>

महाराष्ट्र शासन,पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जलस्वराज्य-२ कार्यक्रम अंमलबजावणी व क्षेत्र बळकटीकरणासाठी खालील पदांची कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांसाठी भरती करावयाची आहे. पद भरतीचे स्थान, पदांची संख्या खाली दर्शविलेल्या प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदभरतीचे ठिकाण | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता | एकुण ठोक मानधन | अनुभव | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी तज्ञ (सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन/पाणी गुणवत्ता तज्ञ) | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जि.प.रायगड | १ | बीटेक/बी.ई (सिव्हील ) / एन्व्हॅायरमेंटल इंजिनिअरींग किंवा मान्यतापात्र विदयापीठाची समकक्ष पदवी. | २५०००/- | अनुभव असणा-या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल | सर्व पदांसाठी दिनांक ३१-१-२०१५ रोजी उच्चतम वयोमर्यादा ५० राहील. से.नि.अधिकारी/ निम सरकारी अीकारी/कर्मचा-यांची कंत्राटी पदावर नियुक्ती करताना वयाची कमाल मर्यादा ६५ राहील. |
| २ | सल्लागार (पाणी गुणवत्ता) | ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग | ५ | कोणत्याही मान्यत प्राप्त विदयापीठाची पदवी , रसायनशास्त्र विषयामधील पदविधारकांस प्राधान्य | ८०००/- | | |
| ३ | ग्रामलेखा समन्वयक | ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग | ६ | बी.कॅाम किंवा मान्यता प्राप्त विदयापीठाची पदवी, डबल अकाऊंटींग किंवा टॅली ज्ञान आवश्यक | ८०००/- | | |

इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज (**A-४** मध्ये) सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेसह दिनांक २१ /२/२०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून )उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,चौथा मजला, रायगड जिल्हा परिषद,अलिबाग येथे पोस्टाने किंवा समक्ष सादर करावा. विहित वेळेनंतर / तारखेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यांत येणार नाहीत. उमेदवारांनी लखोटयावर अर्ज केलेल्या पदाबाबत सुस्पष्टपणे "------------------------------------- "या पदासाठी अर्ज असे नमुद करणे आवश्यक आहे. अपूर्ण स्वरुपातील अर्ज पद भरती प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. उपरोक्त पदासाठी अर्जाचा नमुना,शैक्षणिक अर्हता,अनुभव,वय,मानधन,अटी व शर्ती, निवड प्रक्रीया इ.बाबतचा सविस्तर तपशिल **www.zpraigad.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर पद भरती प्रक्रियेत बदल करण्याचा अथवा रदद करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे.

ठिकाण- रायगड-अलिबाग

दिनांक- २/२/२०१५

सही/-
(पुंडलिक साळुंके)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)
जिल्हा परिषद,रायगड

सही/-
(सुनिल पाटील)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,रायगड

## विहित अर्जाचा नमुना

## जलस्वराज्य-२ प्रकल्प,जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद,रायगड-अलिबाग

-------------------------------------------------------या पदासाठी अर्ज

| |
|---|
| अलिकडील ६<br>महिन्यातील<br>पासपोर्ट<br>आकारातील फोटो |

१. उमेदवाराचे नाव :-

२. उमेदवाराचा पुर्ण पत्ता :-
(ई मेल व पिनकोडसह)

३. दूरध्वनी क्रमांक/ भ्रमणध्वनी क्रमांक:-

४. उमेदवाराची जन्मतारीख :-

५. जन्म ठिकाण :-

६. दिनांक ३१-१-२०१५ रोजीचे वय :-

| दिवस | | महिने | | वर्ष | |
|---|---|---|---|---|---|

७. शैक्षणिक अर्हता (इ.१० वी पासून पुढे) :-

| अ.क्र. | अर्हता धारण केलेल्या परिक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | | |

८. अनुभव (वर्ष/ महिने) :-

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | पदाचे नाव | काम केल्याचा कालावधी (वर्षात) |
|---|---|---|---|
| | | | |

दिनाक :

स्थळ : उमेदवाराचे नाव व सही /-

# सर्व पदांकरिता सर्वसाधारण अटी व शर्ती

१. सर्व पदांसाठी दिनांक ३१-१-२०१५ रोजी उच्चतम वयोमर्यादा ५० राहिल. सेवानिवृत्त सरकारी / निम सरकारी अधिकारी/ कर्मचा-यांची कंत्राटी पदावर नियुक्ती करताना वयाची कमाल मर्यादा ६५ वर्षे राहिल.

२. अभियांत्रिकी तज्ञ (सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन / पाणी गुणवत्ता तज्ञ) पदांकरिता पाणी व स्वच्छता क्षेत्रातील किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. सल्लागार (पाणी गुणवत्ता) व ग्रामलेखा समन्वयक या पदांकरिता पाणी व स्वच्छता क्षेत्रातील किमान १ वर्षाचा अनुभव असावा. (अनुभव हा शासकिय / निमशासकिय कार्यालयातीलच गृहीत धरला जाईल मात्र असे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुभवाची अट शिथील करण्यात येईल)

३. वरील पदांसाठी विहित नमुन्यातील अर्ज २१/२/२०१५ रोजी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुटटीचे दिवस वगळून) **सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) , जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, ४ था मजला, रायगड जिल्हा परिषद,अलिबाग** येथे स्विकारणेत येतील.उमेदवाराने लखोटयावर "जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,जिल्हा परिषद रायगड-------------------------पदासाठी अर्ज "असे स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे. पोस्टाने / हस्तपोच आलेले अर्ज ही स्विकारले जातील. मात्र सदर मुदतीनंतरचे प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व याबाबत कोणताही पत्रव्यवहार या कार्यालयाकडून केला जाणार नाही.

४. उमेदवारांच्या अर्जाची छाननी करुन प्रथम पात्र उमेदवार व अपात्र उमेदवार यांची यादी जिल्हा परिषद,रायगडच्या नोटिस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानंतर आक्षेप/ हरकती असल्यास या कार्यालयास कार्यालयीन वेळेत (सुटटीचे दिवस वगळून) स्विकारणेत येतील. सदर आक्षेप / हरकतींचा विचार करुन अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार किंवा कोणत्याही प्रकारचा संपर्क केला जाणार नाही.

५. उमेदवाराला मराठी व इंग्रजी भाषेचे तसेच संगणकाचे ज्ञान असावे.

६. उमेदवाराने मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. उपस्थितीबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा अन्य भत्ते देय राहणार नाहीत.

७. अर्जदाराने अर्जाच्या उजव्या कोप-यात स्वत:चा अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो लावून त्यावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. विहित नमुन्यात नसलेले अपुर्ण भरलेले अर्ज, आवश्यक कागदपत्र न जोडलेले, फोटो न लावलेले, स्वाक्षरी नसलेले अपूर्ण अर्ज अपात्र करणेत येतील.

८. निवड समितीव्दारे मुलाखत घेवुन उमेदवारांची अंतिम निवड करणेत येईल.

९. अंतिम निवड झालेल्याउमेदवाराने जिल्हा परिषदेला रक्कम रुपये १००/- च्या बॉंडपेपरवर ११ महिन्याच्या कालावधीसाठी करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

१०. उपरोक्त पद भरतीच्या नियम/ निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत शासन अधिसुचना / शासन निर्णय / शासन परिपत्रक / सर्वसाधारण पत्रानुसार होणारे बदल बंधनकारक राहतील.

११. पदभरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व अंतिम निर्णय जिल्हा निवड समितीचे राहतील.

१२. निवडसुची प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवाराच्या मुळ कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. तपासणीवेळी उमेदवाराने पदासाठीची आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास किंवा उमेदवार पदासाठी अपात्र ठरत असल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येवून प्रतिक्षासुची वरील उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

१३. अभियांत्रिकी तज्ञ (सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन/ पाणी गुणवत्ता तज्ञ) या पदाकरीता अर्हता प्राप्त उमेदवारांपैकी गुणानुक्रमानुसार १ : १० प्रमाणात गटचर्चा व गटचर्चेतून १ : ५ या प्रमाणात गुणानुक्रमानुसार उमेदवार निवडून मुलाखतीव्दारे उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१४. सल्लागार (पाणी गुणवत्ता) व ग्रामलेखा समन्वयक या पदांकरिता १ : ५ या प्रमाणात गुणानुक्रमाकनुसार उमेदवार निवडून मुलाखतीव्दारे उमेदवाराची निवड करण्यात येईल.

**सही/-**
**(पुंडलिक साळुंके)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)**
**जिल्हा परिषद,रायगड**

**सही/**
**(सुनिल पाटील)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,रायगड**